(7)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा ३/झोपुआ/ ८०८/२०२४
दिनांक : १२/०३/२०२४

**झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (अंतिम)**

**महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम आदेश**

प्रस्तावना -

स.नं.१४पै, सि.स.नं.२८३४,२८३७ ते २८४९, २८५२, २८५३, २८५८ ते २८६०, २८६२ ते २८६५, २८६७, २८६९, आदर्शनगर, पिंपरी येथील अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करणेत येत आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे हे सक्षम आहेत; आणि

२) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.१२/०१/२०२४ रोजीची पूर्वसूचना प्रत्यक्ष जागेवर दि.२५/०१/२०२४ रोजी डकविण्यात आली असून दि.२६/०१/२०२४ रोजीच्या दैनिक राष्ट्रतेज व हमारा महानगर या स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-१, पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, जानेवारी २५-३१, २०२४ मध्ये पृष्ठ क्र.४, ५ व ६ वर प्रसिध्द करण्यात आली आहे; आणि

३) ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेली मिळकतीलवरील योजनेचे क्षेत्र ३५४९.२५ चौ.मी. असून सदर मिळकत महाराष्ट्र शासन राजपत्र दि.३१/०१/१९९१, पान न.२५० मध्ये २१८२७.२४ चौ.मी. एवढे क्षेत्रावर झोपडपट्टी म्हणून घोषित करणेत आलेली आहे; आणि

४) ज्याअर्थी, मा. जिल्हाधिकारी, पुणे (महसूल शाखा) आणि मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्माविण्यात आले होते. त्यानुसार सदर दि.१२/०१/२०२४ रोजीच्या झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेबाबतची पुर्वसूचना नोटीशीस कोणतही हरकत/सूचना प्राप्त झालेली नाही; आणि

५) ज्याअर्थी, सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबतच्या संदर्भात कोणताही प्रतिबंधात्मक आदेश नसल्यामुळे व झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसंदर्भातील परिस्थिती अस्तित्वात असल्याने सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेबाबत पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे; आणि

६) ज्याअर्थी, सदर योजनेकरिता ३५४९.२५ चौ.मी. इतक्या क्षेत्राकरिता अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीकरिता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश ३(क) अंतिम करणे क्रमप्राप्त आहे; आणि

त्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद एकूण ३५४९.२५ चौ.मी. एवढे योजना क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झाल्याने उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता सदर अधिनियमातील कलम ३(क) च्या तरतुदीनुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश :-

(१) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) अंतर्गत या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे मुंबई ,येथे अपील दाखल करता येईल.

## अनुसूची

झोपडपट्टीचे नाव :- स.नं.१४पै, सि.स.नं.२८३४,२८३७ ते २८४९, २८५२, २८५३, २८५८ ते २८६०, २८६२ ते २८६५, २८६७, २८६९, आदर्शनगर, पिंपरी, जिल्हा- पुणे.

महानगरपालिका क्षेत्र :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

| गाव- आकुर्डी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स.नं./ सि.स.नं. / फा.प्लॉ.क्र | जमीन/ भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) (त्रिमितीय पध्दतीने) | योजनाक्षेत्राची चतु:सिमा | | | |
| | | | पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| स.नं.१४पै, सि.स.नं.२८३४, २८३७ ते २८४९, २८५२, २८५३, २८५८ ते २८६०, २८६२ ते २८६५, २८६७, २८६९, आदर्शनगर, पिंपरी | महाराष्ट्र शासन | ३५४९.२५ चौ.मी. | नाला | लागू स.नं.१४पै सि.स.नं. २८६९पै, २८६७पै, २८५१पै | लागू स.नं.१४पै, लागू सि.स.नं. २८७९ पै | लागू स.नं.१४पै सि.स.नं. २८३३/१पै २८३४पै २८४२पै, २८४५पै, २८४६पै, |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे

दिनांक :- १३ /०३ /२०२४.

(नीलेश र. गटणे) (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत-

१. मा.जिल्हाधिकारी, पुणे (महसूल शाखा)- यांसकडे माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव सादर.

२. मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका - यांना माहितीस्तव सादर.